# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 361/2023 दिनांक : 19.09.2023**

## 1)घरफोडी :—

**कुंटूर :—** दिनांक 17.09.2023 रोजी चे 22.00 ते दि. 18.09.2023 चे 03.30 वा. चे दरम्यान, **मौ. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील आज्ञात आरोपीने फिर्यादी व साक्षीदार यांचे घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील फिर्यादीचे आईचे लोखंडी पेटीतील व फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील नगदी 75,000/—रूपये सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैसे व साक्षीदार यांचे घरातील 61,500/—रूपये व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 1,31,000/—रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी राऊफ पि. अल्लाबक्ष कल्यापुरे, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती रा. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 165/2023 कलम 457, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कुसमे, मो.क्रं. 9552516195** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**कंधार :—** दिनांक 17.09.2023 रोजी चे 21.00 ते दि. 18.09.2023 रोजी चे 08.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेततुन मौ. उमरगा खो. शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची उमरगा खो शिवारातील विहीरीमध्ये टाकलेली सीआर आय 7.5 एचपी कंपणीची पाण्याची मोटार व 70 फुट केबल वायर व स्टार्टर असी एकुण किंमती 40,000/—रूपयाचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी धनाजी पि. तुकाराम केंद्रे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरगा खो. ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 284/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो. क्रं. 9421761652** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :—

**धर्माबाद :—**दिनांक 14.09.2023 रोजी सायंकाळी 16.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे किराणा दुकाना समोरील सार्वजनिक रोडवर हरेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा मित्र हा आरोपीचे दुकानातील सार्वजनिक रोडवर थांबुन बोलत असतांना तेवढयात एसटी महामंडळाची बस आली तेंव्हा फिर्यादीने त्याचे मित्रास आरे कुत्र्या तुला जाण्यासाठी बस थांबत नाही तु त्याला थांबुन दाखव असे म्हणाले असता तेवढयात यातील आरोपी हा दुकानाबाहेर येवुन फिर्यादीस तु मला कत्रा का म्हणतोस म्हणुन फिर्यादीच्या अंगावर पडुन उजवा हात धरून झटापट करून जमिनीवर आपटुन फिर्यादीचे उजव्या हातात गंभीर दुखापत करून फॅक्टचर केले व इतर दोन आरोपीतांनी दगड घेवुन फिर्यादीचे उजव्या कानाजवळ मारून जखमी केले. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्यारू पिराजी कवडेकर, वय 58 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. हरेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 239/2023 कलम 325, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2022 मठपती, मो. नं. 8390589720** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दि. 18.09.2023 रोजी चे 09.30 वा. चे सुमारास, **सप्तगीरी पेट्रोलपंपाच्या पुढे विष्णुपूरी जाणारे रोडवर ता. जि. नांदेड येथे, मयत नामे पांडुरंग शेषेराव नाईक, रा. सावळी ता. मुखेड नांदेड** हा बँकेच्या कामासाठी जात असतांना यातील हायवा टिपर क्रमांक एमएच—12/क्युडब्ल्यु—5102 च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयी व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयताचे मो सा क्रमांक एमएच—26/एएम—9892 ला पाठीमागुन जोराची धडक देवुन त्यांचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी माधवराव पि. शेषेराव नाईक, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. ह. मु. जिजाउनगर ताटे यांचे घरी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 674/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.क्र. 9923895077** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :—

**कुंटूर :—** जानेवारी 2021 ते डिसेंबर 2021 चे दरम्यान, **इंडिया मेगा ॲग्रो अनाज लिमिटेड कंपणी डी —03 एमआय डी सी कुष्णूर ता. नायगांव खै जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून जानेवारी, 2021 ते डिसेंबर 2021 चे दरम्यान, इंडिया मेगा अग्रो अनाज लिमीटेड कंपणी डी —03 एमआय डी सी कुष्णूर येथील स्वयंस्थापीकीय संचालक व कंपणीचे इतर संचालक यांनी फिर्यादी व इतर चौदा शेतकरी यांचा हरभरा, सोयाबीन, हळद, व शेतमाल गोर गरीब शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवीलेला शेतमाल विश्वासाने खरेदी करून त्या शेतमालाची रक्कम व खोटे आश्वासन देवुन दोन ते अडीच वर्षापासुन सतत खोटे बोलुन व खोटे आश्वासन देवुन अप्रमाणिकपणे शेतकऱ्याचे शेतमालाची रक्कम न देता स्वताच्या फायदयासाठी 16,82,71,991/—रूपयाची(16 कोटी 82 लाख 71 हजार 991 रूपये) एवढया रक्कमेचा विश्वासघात करून अपहार करून शेतकऱ्याची व फिर्यादीची अर्थिक फसवणुक कली. पैसे मागविण्यास गेले असता तुम्हाला काय कराचे ते करा असे बोलुन धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संभाजी पि. किशनराव ताटे, व 49 वर्षे, व्यवसाय शेती रा. बावलगाव ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 166/2023 कलम 420, 406, 409, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री व्ही आर कुसमे, मो.नं. 9552516195** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**1)विमानतळ :—**दिनांक 18.09.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **मालटेकडी ओव्हर बिजच्या खाली नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीतया तीन गावठी पिस्टल व 15 जिवंत काडतुस किंमती 99,000/—रूपयाचे हत्यार ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री रवि वैजनाथ वाहुळे, स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 316/2023 कलम 3/25, 7/25 भारतीय हत्यार कायदा सह कलम 135 म. पो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.क्र. 9765902710** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :—**दिनांक 17.09.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **दुकानासमोर उंदरी पमु ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी त्याचे दुकानात असतांना यातील नमुद आरोपीने दुकानातील सामान घेवुन सामानाचे पैसे न दिल्याने फिर्यादी हा त्यास पैसे मागितले असता तुला कशाचे पैसे द्यायचे बे मादरचोदा असे अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. व गावामध्ये हातात खंजर घेवुन फिरत आहे. वगैरे **फिर्यादी शेख चांद साहब मोहिदिन साहब, वय 48 वर्षे व्यवसाय किराणा दुकान रा. ऊंदरी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 194/2023 कलम 294, 323, 506, भादवि सह कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/भालचंद्र तिडके, मो.क्र. 9823156052** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड